# राष्ट्रीय आरोग्य अभियान, अलिबाग-रायगड.
## पदभरती जाहिरात.
### दि. २०/०२/२०२४

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने दि. २९/०६/२०२४ रोजी पर्यंत खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधी न राहून भरणेसाठी थेट पदभरती प्रक्रियेव्दारे भरणेची आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| संवर्गाचे नाव | पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता | संबधित पदाचे नियुक्तीचे ठिकाण | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| District Program Manager (AYUSH) | Graduation degree in any discipline AYUSH & MBA in Healthcare Management Masters in public health/hospital administration/post graduation Diploma in hospital & healthcare management (2year) from AICTE recognized institute with minimum 3 year working experience in public health programme. Exposure in social sector schemes/missions at national, state & district level & Computer knowledge including MS Office, MS Word, MS Power point, excel would be desirable preference will be given to persons having experience of working in health sector AYUSH | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष | ३५०००/- |
| Data Entry operator (AYUSH) | Graduation in computer application /IT/ Business Administration / B.Tech(C.S.) or (I.T.)/BCA/BBA/BSC- IT /graduation with 1 year diploma/ certificate course in computer's science from recognized institute or University. Minimum 1 Year of experience in government. Exposure in social sector schemes at national, state & district level & computer knowledge including MS Office, MS Word, MS Power point, excel, MS access would be essential. Typing speed of English (30WPM) & Hindi/Marathi (25 WPM) would be essential. Preference will be given to persons who have experience of working in health sector AYUSH | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष | १८०००/ |

❖ ***अटी व शर्ती-***

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही व या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासना मार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हासंबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व उमेदवाराची निवड झालेनंतर नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर उमेदवाराने राज पत्रित अधिकारी यांचा वर्तणूकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

४) उपरोक्त कंत्राटी पदां करीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल. राज्यस्तरावरुन प्राप्त कृती आराखडा व मार्गदर्शक सुचनां नुसार वर नमूद मानधना मध्ये बदल होऊ शकतात.

५) <u>अनुभवी व उच्च शैक्षणिकअर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.</u>

CamScanner

६) जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो व रिक्त ठिकाणा मध्ये बदल होऊ शकतो. तसेच सदर पदे ही एकाकी असल्याने त्यांस आरक्षण लागू नाही.

७)केंद्र शासनाने संबधित पदे नामंजूर केल्यास त्यांच्या सेवा कोणत्याही पूर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करणेत येतील.

८) सदर पदभरती प्रक्रियेसाठी इच्छूक उमेदवारांनी विहित नमुन्या तील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्य प्रतीसह आपले अर्ज दि.२०/०२/२०२४ ते दि.२९/०२/२०२४ (कार्यालयीन दिवशी) या कालावधीमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० या वेळेमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय (जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर), दुसरा मजला, जिल्हा रुग्णालय अलिबाग, पिनकोड - ४०२२०१ या कार्यालयामध्ये प्रत्यक्ष अथवा पोस्टाने सादर करावेत. दि.२९/०२/२०२४ रोजी सायंकाळी ५.३० नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही तसेच ईमेलव्दारे प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. या शिवाय सोबत जोडलेल्या नमुन्यातील पूर्णपणे भरलेला अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रे व नमुन्या मध्ये जोडलेली कागदपत्रांची यादी (चेकलिस्ट) अशा परिपूर्ण कागद पत्रांसह उमेदवारांनी अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

९) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रियेमध्ये अर्जाची छाननी केले नंतर निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी रायगड जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल या बाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार तसेच ईमेलव्दारे उमेदवारांना सुचित केले जाणार नाही.

१०) भरती प्रक्रिया स्थगित करणे / रदद् करणे / पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प.अलिबाग यांचेस्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही व न्यायालयात जाता येणार नाही.

११) वयोमर्यादा :-१८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. राष्ट्रीय अभियानअंतर्गत सेवा प्रवेशाची कमाल वयो मर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्षे, राखीव प्रवर्गा साठी ४३ वर्षे राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारां करिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षां पर्यंत शिथिल राहील.

१२) सदर भरती प्रक्रिये करीता निवड यादी प्रसिध्द करणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनां नुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ.बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी रायगड जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे दबाव तंत्राचा वापर किंवा अन्य अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्या वर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल व त्यास राष्ट्रीय आरोग्य अंतर्गत भविष्यातील पद भरती करिता अपात्र ठरविणेत येईल.

१४) उमेदवारांनी जाहिराती मध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे -

- विहीत नमुन्यातील अर्ज (सदर अर्जाचा नमुना जाहिराती सोबत संकेतस्थळावर उपलब्ध असेल)
- शैक्षणिक अर्हते बाबतची सर्व प्रमाण पत्रे व गुण पत्रिका (१० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर या शैक्षणिक अर्हतेच्या सर्व वर्षे व सर्व सत्रांच्या गुणपत्रिका)
- शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला

CamScanner

- NHM,शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील अनुभवाचा दाखला तसेच COVID अंतर्गत शासकिय आरोग्य संस्थेतील अनुभवाचा दाखला असल्यास प्राधान्य दिले जाईल.
- जतीचे प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र
- संबंधित पदा करिता सक्षम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट),नोंदणीचे नुतनीकरण व कौन्सिलचे आयकार्ड
- पासपोर्ट आकाराचे २ फोटो
- उमेदवाराच्या नावांत बदलझाला असल्यास शासनाचे राज पत्र
- आधार कार्ड
- पॅन कार्ड
- लहान कुटुंबाचे प्रमाण पत्र

१५) या शिवाय नियुक्ती आदेश स्विकारताना उमेदवारांनी अर्जा मध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या पडताळणी करिता मूळ प्रती सादर करणे बंधनकारक राहील.मूळ प्रती सादर न केल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

१६) उमेदवाराच्या पुर्वीच्या कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकिय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

१७) राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्गदर्श कसुचनां नुसार अर्ज करणाऱ्या उमेदवाराने या पूर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केले असल्यास व त्याची अकार्यक्षमता/अनियमिततेच्या कारणामुळे सेवा समाप्त करणेत आली असल्या ससदर पद भरती करिता अशा उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

१८) मुद्दा क्र.१५,१६ व १७ मध्ये नमुद बाबी नियुक्ती नंतर कोणत्याही टप्प्यावर आढळून आल्यास त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल व त्यास राष्ट्रीय आरोग्य अंतर्गतभ विप्यातील पदभरती करिता अपात्र ठरविणेत येईल.

दिनांक :- १०-२/२०२४
ठिकाण :-अलिबाग

(डॉ.मनिषा विखे)
सदस्य सचिव,
तथा,
जिल्हा आरोग्य अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

(डॉ.भरत बास्टेवाड)भा.प्र.से.
निवड समिती अध्यक्ष,निवड
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद,

CamScanner